Vol 2 Issue 1 July 2012

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research thoughts
Volume 2, Issue. 1, July 2012
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# भाषा व समाज

निलेश व्यंकटराव देगांवकर

सहाय्यक प्राध्यापक व मराठी विभाग , कोहिनूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खुलताबाद, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद .

**सारांश :**

मानव हा एक समाजशील प्राणी आहे असे म्हंटले जाते. याचा अर्थ असा की, आपल्या आजूबाजूच्या मानवाशी अनेक प्रकारे सहकार्य करून त्यांच्याशी संबंध, नाती जुळवून एकत्र राहण्याची मानवाची प्रवृत्ती असते. नुसते एकत्र राहण्याची प्रवृत्ती पशु—पक्षी आणि कीटकांमध्येही असते; पण त्यांच्यात व मानवात फरक असा की, मानव एकत्र रहातो, तो नुसते समुह किंवा कळप करून नव्हे. एकत्र येताना मानवप्राणी परस्परांशी संबंध व नाती जुळतात. मानव प्राण्यांच्या सहकार्याच्या प्रक्रियेचे काही निश्चित असे आकृतिबंध तयार होतात.

## प्रस्तावना—

सामाजिक अस्तित्वाच्या व संबंधाच्या पातळ्या निर्माण होतात. एकंदर जीवनाविषयी आचारविचारांविषयी काही नियम मान्य होतात. यातूनच कुटूंब, विवाह यासारख्या सामाजिक संस्था उदयास येतात. सामाजिक व्यवहारामध्ये एक मूल्यव्यवस्था निर्माण होते. श्रद्धा, कला, रूढी व परंपरा या व इतर व्यवहारांमधूनही जीवनाचे नियंत्रण करणारी मूल्यव्यवस्था व्यक्त होत असते. या साऱ्यांच्या व्यामिश्र संघटनेला संस्कृती असे म्हणतात. सामाजिक व सांस्कृतिक जीवनामध्ये आवश्यक असलेल्या संपर्क क्रियेसाठी व सहकार्यासाठी मानव अनेक प्रकारच्या संदेशनाच्या पद्धती किंवा व्यवस्था वापरतो. भाषा ही मानवाची सर्वात महत्वाची संदेशन पद्धती आहे. मानवी समाज व संस्कृती यांचा ती एक अविभाज्य घटक आहे. म्हणूनच भाषा ही एक सामाजिक प्रक्रिया आहे असे म्हंटले जाते. व्यक्तीच्या सामाजिकरणात त्याला समाजशील प्राणी बनविण्यास भाषेचा मोठा सहभाग असतो. सामाजिक संबंध, निर्माण करण्यासाठी, राखण्यासाठी, वाढवण्यासाठी आणि तोडण्यासाठी सुद्धा भाषेचा वापर सुलभतेने होत असतो. सामाजिक सहकार्याचा व्यवहार फार मोठ्या प्रमाणावर भाषेव्दाराचा घडत असतो. एखाद्याशी अबोध आधाराने ही गोष्ट त्यामुळेच व्यक्तीव्यक्तींमधील संबंधांच्या दृष्टीने अथपूर्ण ठरते. सामाजिक संबंधांप्रमाणेच सामाजिक, सांस्कृतिक मुल्य ही भाषेतून व्यक्त होतात तेंव्हा सामाजिक संपर्काचे एक अत्यंत महत्वाचे साधन म्हणून भाषा अनिवार्यपणे समाजामध्ये वावरत असते. म्हणूनच सामाजिक भाषाविज्ञान आज मोठ्या प्रमाणात लोकप्रिय ठरू पाहत आहे.

भाषा व समाज यांच्या संबंधांचा विचार करतांना सामाजिक जीवनामध्ये जितके गट पडतात त्या गटांच्या भाषेकडही तितक्याच जिज्ञासू वृत्तीने लक्ष दिले पाहिजे. आर्थिक वर्गव्यवस्था, सामाजिक वर्गव्यवस्था, जातीय वर्गव्यवस्था, स्त्री—पुरूष यांच्या विभिन्नतेमुळे भाषेत वेगवेगळेपणा आढळतो. बर्नस्टाइन या ब्रिटिश समाज वैज्ञानिकाने न्यून सिद्धांत मांडला आहे. समाजातील आर्थिक स्तर आणि भाषा यामध्ये एक विशिष्ट प्रकाराचा संबंध असतो असे मत बर्नस्टाइनने ब्रिटीश समाजाचे विश्लेषण करत असताना मांडले आहे. मर्यादित प्रयोग व्यवस्था व विस्तारित प्रयोग व्यवस्था असे दोन भाषाभेद मानून त्याचा संबंध अनुक्रमे निम्न व मध्यम आर्थिक स्तरांशी असतो असे दाखविण्याचा प्रयत्न त्याने केला आहे. भाषिक प्रयोगव्यवस्था या दोन प्रकारांमध्ये बर्नस्टाइनने जो फरक केलेला आहे तो पुढीलप्रमाणे मांडता येईल.

1. विस्तारित प्रयोगव्यवस्था ही औपचारिक, बौद्धिक चर्चा व वादविवाद यामध्ये वापरली जाते, तर मर्यादित

Please cite this Article as : निलेश व्यंकटराव देगांवकर , भाषा व समाज : Golden Research Thoughts (July; 2012)

LBP

प्रयोगव्यवस्था अनौपचारिक संदर्भात, कुटूंबात व मित्रमंडळाशी बोलताना होते.

2. विस्तारित प्रयोगव्यवस्थेत बोलणाऱ्याच्या व्यक्तिवैशिष्ट्यावर भर असतो. उलट मर्यादित प्रयोगव्यवस्थेमध्ये व्यक्तिवैशिष्ट्य यापेक्षा बोलणाऱ्याच्या सामाजिक अस्तित्वावर, त्याच्या वर्ग वैशिष्ट्यावर भर असतो.

वरील दोन भाषिक प्रयोगव्यवस्थांचा संबंध समाजाच्या आर्थिक वर्गाशी बर्न स्टाइनने जोडला आहे. मध्यम वर्गातील मुले विस्तारित व मर्यादित या दोन्ही प्रयोगव्यवस्था वापरू शकतात, तर निम्न वर्गातील मुलांना फक्त मर्यादित प्रयोगव्यवस्थाच उपलब्ध होउ शकते, असे बर्नस्टाइन या सामाजिक भाषावैज्ञानिकाला संशोधन करताना आढळले आहे. या संशोधनाचा आधार घेउन बर्नस्टाइनच्या अमेरिकेतील अनुयायांनी न्यू–सिद्धांत मांडला आहे. निम्न (कामकरी) आर्थिक वर्गातील मुले शालेय शिक्षणात अभ्यासात मागे पडतात. याचे कारण विस्तारित प्रयोगव्यवस्थेचा त्याच्याकडे असणारा अभाव हे होय. केवळ मर्यादित प्रयोगव्यवस्थेचा उपयोग करणे शक्य असल्याने या मुलांमध्ये बौद्धिक कमतरता किंवा न्यून निर्माण होतो. त्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगती खुंटते. असे झाल्याने सामाजिक यशाचे दरवाजेही त्यांना बंद होतात. याउलट मध्यमवर्गातील मुले समाजामध्ये भराभर यशस्वी होण्याचे कारण म्हणजे मध्यमवर्गाकडे विस्तारित व मर्यादित या दोन्ही प्रयोगव्यवस्था उपलब्ध असतात. या दृष्टिकोनाचा अमेरिकन शिक्षणपद्धतीवर बराच प्रयोग झाला आहे. केनेडी व जॉन्सन यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत समाजविज्ञान, मनोविज्ञान व भाषाविज्ञान या क्षेत्रातील अभ्यासकांना निम्न आर्थिक स्तरातील लोकांची जीवनभाषा यांची तपासणी करण्यास सांगण्यात आले. 1960–70 मध्ये सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिकदृष्टया मागासलेल्या वर्गाची पाहणी करणारे अनेक ग्रंथ निर्माण झाले. यातूनच या वर्गातील विद्यार्थ्यांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या अधिक उपयुक्त अधिक विकसनशील बनविण्याच्या दृष्टीने खास शैक्षणिक अभ्यासक्रम निर्माण करण्यात आले.

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये आर्थिक वर्गभेद किंवा शिक्षणातील भेद यापेक्षाही वर्ण वा जातीच्या नुसार झालेले भेद अजूनही ठळकपणे डोळ्यात भरतात. वर्ण व जाती या जन्मावरून ठरत असतात. त्यामुळे या भेदाची चौकट आपल्या भारतीय समाजात अतिशय ठामपणे उभी आहे. भाषाभेदाच्या बाबतीत वर्ण व जात हे घटक महत्वाचे ठरलेले आहेत. स्पृश्य, सवर्ण व अस्पृश्य वर्ण या भेदानुसार भाषाभेद भारताच्या सर्व प्रांतामध्ये आढळतात. मराठीमध्येही ब्राह्मणी व ब्राह्मणेत्तर अशा प्रकारचे भाषाभेद आढळतात. ब्राह्मणाच्या सांस्कृतिक, धार्मिक वर्चस्वामुळे बहुतेक ठिकाणी ब्राह्मणी बोली हीच प्रमाण बोली म्हणून प्रस्थापित झालेली आढळते. भारतामध्ये जसे वर्ण व जातीभेद आहेत तसेच अमेरिकन समाजामध्ये कृष्णवर्णीय व श्वेतवर्णीय भेद तेथील इंग्रजीमध्ये भाषाभेद निर्माण करतो. निग्रोंची बोली ही अमेरिकन इंग्रजांची बोली आहे. भाषिक ध्वनी, शब्दसंग्रह, व्याकरण या सर्व बाबतीत गोऱ्या लोकांच्या प्रमाणभाषेपेक्षा निग्रोंची भाषा बरीच भिन्न आहे. अमेरिकन श्वेतवर्णीयांच्या बोलीपेक्षा निग्रोंची बोली भिन्न आहे. अमेरिकन लोकांना ती तशी ओळखताही येते. या भिन्नतेमुळे या बोलीला प्रमाणेत्तर मानले गेले आहे. यामुळे काही शैक्षणिक समस्याही निर्माण झालेल्या आहेत; कारण निग्रो मुले शिक्षणात अनेकदा मागे पडतात. ते बौद्धिक व भाषिक कमतरतेमुळे मागे पडतात असे नाही, तर ते बोलींच्या भिन्नतेमुळे मागे पडतात, गोऱ्या लोकांना निग्रोची बोली शिकावी लागली असती तर त्यांचीही तीच अवस्था झाली असती, असे अनेक भाषावैज्ञानिकांनी व शिक्षणतज्ज्ञांनी मान्य केले आहे.

माणसामध्ये व माणसांच्या गटामध्ये जे विविध प्रकारचे भेद समाजव्यवस्थेत निर्माण होतात. त्यातीतल काही भेदांना नैसर्गिक भेदांचा पाया असतो. काही भेद माणसांच्या रंगावर आधारलेले असतात, तर काही आर्थिक व्यवस्थेमुळे निर्माण होतात. आर्थिक भेद हा नैसर्गिक नसतो. तर तो सामाजिक व्यवस्थेमुळे निर्माण होतो. स्त्री व पुरूष अशा स्वरूपाचा भेदभाव नैसर्गिक स्वरूपाचा आहे; परंतु या भेदाला जो सामाजिक व सांस्कृतिक अर्थ प्रत्येक समाजात दिला जातो. त्याचे स्वरूप मात्र त्या समाजाच्या रूढी, परंपरा, दृष्टिकोन या गोष्टींवर अवलंबून असतो. प्रत्येक समाजामध्ये स्त्रियांनी व पुरूषांनी कसे रहावे, कसे वागावे, कसे बोलावे या विषयी काही सामाजिक संकेत निश्चित झालेले असतात. त्याचा परिणाम स्त्रियांच्या व पुरूषांच्या भाषिक वापरावर झालेला आहे. सध्याच्या पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीविषयी बरेच संकेत निर्माण झालेले आहेत. भारतीय समाजाच्या संदर्भात स्त्रीसुलभ लज्जा, संकोच, शील, हळुवारपणा इत्यादी मूल्य भारतीय स्त्रीच्या संदर्भात निगडित झालेली आहेत. म्हणजे हे मूल्यचे तिचे स्त्रीत्व आहे. त्यातून खास स्त्रीसुलभ असे भाषिक वापरांचे संकेत निर्माण झालेले आहेत. अय्या!, इश्श!, गडे!, यासारखी उद्गारवाचके ही वैशिष्ट्ये निदान मध्यमवर्गीय मराठी माणूस स्त्रियांच्या भाषेची वैशिष्ट्ये म्हणूनच ओळखतो. ऑस्ट्रेलियातील अदिम जमातीमध्ये पुरूषांना सासूविषयी अतीव आदरभाव दर्शवावा लागतो. या सामाजिक बंधनाचे भाषिक अविष्कार मोठे गमतीदार आहे. काही जमातींमध्ये सासू उपस्थित असताना पुरूषाला तोंडामधून शब्दही काढायची परवानगी नसते, तर काही जमातीमध्ये सासू असताना विशिष्ट प्रकारची भाषाच वापरावी लागते मध्यमवर्गीय मराठी पुरूष ग्राम्य अश्लील शब्द किंवा शिव्या काही प्रमाणात वापरू शकतो. याचे कारण म्हणजे याचा संबंध पुरूषांच्या संगोपनाविषयी, मर्दानीपणाविषयी जोडला गेला आहे म्हणून त्याला हे शक्य होते. स्त्रियांच्या भाषेत मात्र याचा वापर क्वचितच होताना दिसतो. मात्र सध्याच्या काळामध्ये शिक्षण व नोकरीसाठी घराबाहेर पडलेली स्त्री–पुरूषांमध्ये अधिक मोकळेपणाने मिसळू लागली आहे. अय्या!, इश्श! अशी उच्चारणे कमी होउन ती पुरुषी थाटाची भाषा आता वापरू लागली आहे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org